**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, 22617969 FAX:22690007
Telegram : Edutech E-Mail : mcm.dte@gmail.in Website: http://www.dte.org.in

# अधिसूचना

# अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम

| **मुदतवाढ :- विद्यार्थ्यांना अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ९ मार्च, २००९** |
|---|
| **पर्यत वाढविण्यात आली आहे.** |

निरंतर प्रशिक्षण योजना / तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ / मुक्त विद्यापीठ यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, जैन, शिख, पारशी) विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घंणा-या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती म्हणून प्रती विद्यार्थी प्रशिक्षण शुल्काची प्रत्यक्ष रक्कम किंवा रुपये ४०००/- यापैकी जी कमी असेल एवढी रक्कम अदा करण्याची योजना शासन निर्णय क्र. अविवि- २००० / प्र.क्र.४१/ ०९/ का.१ दिनांक ५ फेब्रुवारी, २००९ नुसार जाहीर करण्यात आली आहे. सन २००८-२००९ साली प्रशिक्षण घेत असलेल्या ५००० निवडक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

**<u>योजनेच्या अटी व शर्ती</u>**

- विद्यार्थ्यांची निवड त्यांनी शालांत परीक्षेमध्ये मिळविलेल्या गुणानुसार गुणवत्तेवर आधारीत राहील.
- विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे.
- अर्जदार भारतीय नागरिक वर उल्लेख केलेल्या अल्पसंख्यांक समाजातील व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
- ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव.

**<u>अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे</u>**

- विद्यार्थ्यांची स्वतःची स्वाक्षरी असल्याचे पासपोर्ट आकाराचे छायांचित्र प्रत.
- शालांत परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्यांची गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.
- विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचा पुरावा उदा. शिधापत्रिकेची प्रत / वीज, दूरध्वनी देयकाची प्रत / पारपत्राची प्रत / निवडणुक ओळखपत्राची प्रत यापैकी कोणतेही एक.
- स्वतःचा व्यवसाय असलेल्या पालकांच्या बाबतीत उत्पन्नाच्या सर्व स्त्रोतांद्वारे मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाविषयीचे अ-न्यायीक स्टॅम्प पेपरवरील घोषणापत्र / नोकरीस असलेल्या पालकांच्या बाबतीत नियोक्त्यांकडून प्राप्त केलेला उत्पन्नाचा दाखला किंवा आयकर विवरण पत्राची सत्यप्रत.

अर्जदाराने विहित नमुन्यामध्ये अर्ज करुन आवश्यक कागदपत्रांसह प्रशिक्षण घेत असलेल्या संस्थेच्या प्राचार्यांकडे सादर करावा. अर्जाचा नमुना www.dte.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज पूर्ण भरुन प्राचार्यांकडे/ संस्था प्रमुखाकडे सादर करावयाची **<u>अंतिम तारीख ०९/०३/२००९ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. प्राचार्यांनी सदर अर्ज थेट संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडे १६/०३/२००९ पर्यंत सादर करावे.</u>** निवड झालेल्या उमेदवारांची यादी संचालक तंत्र शिक्षण निश्चित करतील व www.dte.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करतील.

अधिक माहितीकरिता ०२२-२२६१७९६९ वर संपर्क साधावा.

**अल्प मुदतीच्या खालील प्रशिक्षण वर्गाचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. ती यादी शासन निर्णयाच्या प्रपत्र-क मध्ये देण्यात आलेली आहे.**

१) महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट कोर्स इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (एमएससीआयटी), २) सर्टिफिकेट कोर्स इन फौंड्री टेक्नॉलॉजी, ३) सर्टिफिकेट कोर्स इन फिलोक्सोग्राफिक प्रिंटिंग/ऑफसेट प्रिटींग/स्क्रीन प्रिंटींग, ४) सर्टिफिकेट कोर्स इन एम्बेडेड सिस्टिम, ५) सर्टिफिकेट कोर्स इन एनर्जी मॅनेजमेंट ॲण्ड ऑडिट, ६) कॉम्प्युटर हार्डवेअर मेन्टेनन्स, ७) कॉम्प्युटर नेटवर्कींग, ८) लॅपटॉप मेंन्टेनन्स, ९) मोबाईल मेन्टेनन्स, १०) फॅक्स/प्रिंटर/कॉम्प्युटर मेंन्टेनन्स, ११) प्रोग्रॅमेबल लॉजिक कंट्रोलर (पीएलसी), १२) पी.सी.बी. डिजाईन, १३) एएसपी नेट प्रोग्रॅमिंग, १४) जावा/ॲडव्हान्स जावा/सी प्रोग्रॅम इ., १५) कोरल ड्रॉ पेज मेकर/फोटोशॉप इलस्ट्रेटर, १६) ॲनिमेशन/मल्टीमेडीया/वेब डिझाईनिंग, १७) ऑटोकॅड/कॅटीया, १८) एनएक्स – ४, १९) मॅटलॅब, २०) बुक बाईंडिंग, २१) ॲडव्हान्स ऑटोमोटीव कोर्स, २२) एअरक्राफ्ट मेन्टेनन्स, २३) फूट वेअर डिजाईन, २४) अल्पमुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम - हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, ट्रॅव्हल ॲण्ड टुरीझम, २५) अल्पमुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम – ड्रेस डिजाईन ॲण्ड फॅशन टेक्नॉलॉजी, २६) शासकीय कला महाविद्यालयातील अल्पमुदतीचे प्रमाणपत्र व्यावसायिक अभ्यासक्रम, २७) राज्य शासनाच्या अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्थामधील अल्पमुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

सही/-
( डॉ. सु. का. महाजन )
प्र.संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई